# पर्यावरण पूरक हरित ग्रंथालय

**डॉ. रंजना व्यवहारे**
ग्रंथपाल
विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट्स ॲन्ड कॉमर्स
Email - taywade@gmail.com

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i1.60

---

***सारांश :***

*सध्याच्या काळात पर्यावरणावर सगळीकडे चर्चा होतांना आपन बघतच आहोत. याचे कारणही तसेच आहे. सगळीकडे प्रदूषणाचा विस्फोट झाल्याचे दिसून येत आहे. एकीकडे आधुनिक युगात सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञानाचा विकास झालेला आहे. या तंत्रज्ञानाच्या विकासाने मानवाचे संपूर्ण जीवनच बदलून गेलेले आहे. या तंत्रज्ञानामुळे मानवाचा आणि औद्योगिक समूहाचा विकास तर झाला पण या विकासामुळे मानसाला प्रत्येक गोष्टीचा हव्यास वाटू लागला आणि त्या हव्यासामुळे आपल्या आजूबाजूच्या नैसर्गिक साधन संपत्ीचा -हास होण्यास सुरूवात झाली. मनुष्याने आपल्या जीवनाची सर्वांगीन प्रगती या तंत्रज्ञानाने केली हे जरी खरे असले, पण त्याचबरोबर आपल्या नैसर्गीक साधन संपत्तीचा -हास होतो आहे याकडे मात्र दुर्लक्ष झाले. यामुळे पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. यासाठीच एक नवीन संकल्पना उदयाला आली आहे ती म्हणजे हरित इमारत. हरित इमारत म्हणजे नविन इमारत बांधतांना पर्यावरणाचा पुरेपुर विचार करून इमारतीचे बाधकाम करणे. याचाच विचार करून ग्रंथालय व्यवसायात सुद्धा आता हरित इमारत किंवा हरित ग्रंथालय ही संकत्पाना प्रत्यक्षात राबवितांना दिसून येत आहे.*

**की वर्ड :** हरित ग्रंथालय, हरित इमारत, पर्यावरण पुरक वातावरण

---

**प्रस्तावना :**

आजच्या काळात सर्वचजण पर्यावरणावर भरपूर बोलतांना दिसून येतात. पर्यावरण बिघडत चाललय असेही म्हटल्या जाते. पण नेमक पर्यावरण म्हणजे काय? हे मात्र कोणीही स्पष्टपणे बोलत नाही. पर्यावरणाचा Úहास होत आहे. त्यामुळे पर्यावरण वाचविण्यासाठी वेगवेगळया मोहिम राबविल्या जातांना दिसून येतात याचाच एक भाग म्हणजे नैसर्गिक साधन संपत्तीची बचत करणे फार आवश्यक झाले आह.े यात मोठया प्रमाणावर सुरू असणारी वृक्षतोड जंगल तोड थांबवणे, मोठया प्रमाणात झाड लावणे आवश्यक झाले आहे. प्लास्टीकवर पूर्णतः बंदी करणे, सौर उर्जेचा वापर सुरू करणे अशाप्रकारच्या उपयोजना करून समाजात जागरूकता निर्माण तयार केल्या जावू शकते. याला पुरक म्हणून पर्यावरण संवर्धनासाठी हरित इमारती किंवा हरित ग्रंथालय ही संकल्पना पुढे येत आहे.

आधुनिक काळात ग्रंथालया विषयीची नविन संकल्पना उदाास येत आहे. ती म्हणजे हरित गंरथालये, शाळा, महाविद्यालय परिसरात असणारी गंरथालये हरित ग्रंथालयाकडे वाटचाल करीत असल्याचे दिसून येत आहे. बदलत्या वातावरणाचा प्रभाव ग्रंथालयावर मोठया प्रमाणावर होतांना दिसून येतो. पर्यावरण संतूलन राखणे हे एक सामाजिक संस्था म्हणून ग्रंथालयाचे कर्तव्य समजले जाते. पर्यावरण संतूलन राखणे हे आपल्या सर्वांच्या सहकार्याने होवू शकते हे आपल्याला मान्य करावे लागेल. आणि हीच संकल्पना मान्य करून ग्रंथालयाने आपले पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. ग्रंथालयाची पर्यावरण पुरक संकल्पना हरित ग्रंथालय आपल्या समोर येतांना दिसून येत आहे.

**हरित ग्रंथालये :**

हरित ग्रंथालय म्हणजे नैसर्गिक साधनांचा कार्यक्षम वापर करणारी, आरोगयपूर्ण वातावरण निर्माण करणारी ग्रंथालये ज्याचे महत्व पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासासाठी अवाश्यक आहे. पर्यावरणाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी अनेक संास्था प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. अशीच एक सस्ंथा ग्रंथालय आहे.जी पर्यावरण संतुलीत राखण्याकरीता प्रयत्न करीत आहे. 1990 पासून हरित ग्रंथालये चळवळ सुरू झाली असून काही काळापासून ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणण्याचा प्रयत्न केला जातो आहे. ही चळवळ आता ग्रंथालय व्यवसायात सुद्धा काही प्रमाणात राबविल्या जाण्याचा प्रयत्न केल्या जातो आहे. ज्यात ग्रंथालयात पर्यावरणाला पूरक असे वातावरण निर्माण करणे, वीजेचा कमीत कमी वापर करून नैसर्गिक सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करणे. ग्रंथलयात मोकळी हवा येईल अशा प्रकारे सोय करणे. ग्रंथालयातील वातावरण नेहमीच सकारात्मक आणि हरित ठेवण्याचा प्रयत्न करणे

**हरित ग्रंथालयाचे महत्व :**

ग्रंथालय विभागाने हरित ग्रंथालयाचा विचार करतांना त्याचे काही महत्व सांगू शकतो.

1. पर्यावरण संरक्षण
2. उपभोक्त्यासाठी आरोग्यदायी वातावरण
3. ऊर्जा आणि संसाधनाची बचत
4. शाश्वत विकास
5. उपभोक्त्यामध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करणे
6. हरित ग्रंथालयासाठी विविध पद्धती स्पष्ट करणे
7. हरित ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देणे

. नवीन इमारती बांधतांना किंवा ग्रंथालयाची इमारत बांधतांना काही गोष्टीची पूर्तता करून त्या प्रत्यक्षपणे राबविल्या तरच त्यांना हरित इमारत किंवा हरित ग्रंथालये असे संबोधल्या जातील.

**1) इमारत बाधंातांना जागेची निवड :**

इमारतीची जागा निवडतांना योग्य ठिकाणी निवड करणे जेणे करून वाचक ग्रंथालयात पोहचतांना सहजरित्या पोहचू शकतील. इमारतीच्या बाहेर पार्किंगची व्यवस्थित सोय केलेली असावी. इमारतीचे बांधकाम करतांना इमारतीचा आराखडा अशाप्रकारे तयार करण्यात यावा जेणे करून इमारतीच्या खोल्यामध्ये भरपूर प्रकाश येऊ शकेल. हवा खेळती राहायला हवी, खिडक्याची काच वापरताना पारदर्शक वापरावीत. यामुळे वातावरणात प्रसन्नता राहू शकेल.

**2) पाणी संरक्षण :**

इमारतीमध्ये पाण्याची सोय करतांना अनेक उपयोजना पूर्वक सोय करावी. जसे पावसाळयात येणाÚया पावसाचे पाणी साठवून ठेवण्याची (त्पद ॅ्जमत ीूतअमेजपदहद्ध सोय करावी. तसेच विहिर खोदणे, बोअरवेल करणे इ. साधनाचा वापर करू शकतो.

**3) ऊर्जा :**

इमारतीमध्ये जास्त काळ ऊर्जा टिकण्याकरिता इमारतीत नैसर्गिक उजेडाचा वापर जास्त प्रमाणात करणे, वीज बचतीकरिता सौर ऊर्जेचा वापर करावा. इमारतीतील खिडक्या नेहमी खुल्या ठेवाव्या. आवष्यकता नसेल तेव्हा इलेक्ट्रिक सप्लाय बंद करावा.

4) इमारतीतील कचरा आणि अनावश्यक वस्तूचे प्रमाण कमी करणे ग्रंथालयातील निघणारा कचरा याचे योग्य ठिकाणी विल्हेवाट लावणे.

5) ग्रंथालयातील वातावरण नेहमी पर्यावरण पुरक असावे जसे इमारतीच्या आजूबाजूला झाडे लावणे, खाली जागेत फुल झाडे लावणे, बगिच्या तयार करणे. ग्रंथालयाच्या बाहेरील परिसर हरित करणे, तसेच ग्रंथालय हे हळूहळू डिजिटल स्वरूपात तयार करणे, कागदाचा वापर कमी प्रमाणात करणे, नको असेल तेव्हा फॅन, लाईट, बंद करून ठेवणे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात ज्याप्रमाणात तांत्रीक गोष्टीचा प्रसार होतो. त्याच प्रमाणात पर्यावरण संरक्षणाचा सुद्धा प्रसार मोठया प्रमाणावर होतांना दिसून येतो. पर्यावरण संतूलन राखण्यासाठी सर्वप्रथम वृक्षतोड बंद करावी, वीजेचा जो गैरवापर करतांना दिसून येतो तो थांबविणे, तसेच पाण्याचा जो अपव्यय होतांना दिसून येतो त्यांच्यात सुद्धा संतूलन राखणे फार आवश्यक झाले आहे. यासाठीच हरित क्रांतीची मोहिम राबविणे गरजेचे झाले आहे. आपल्या घरी किंवा आजूबाजूच्या परिसरात आवष्यक वस्तूचा योग्य वापर करणे, अस्तित्वात असलेल्या साधनाचा पुरेपुर वापर करून पर्यावरण पुरक वातावरण निर्मिती तयार करणे आवष्यक झाले आहे.

पुर्वीच्या काळापासून तर आजपर्यत गं्रथालये नेहमीच ज्ञानप्रसाराचे कार्य करीत आहे. समाजाच्या सामाजिक, बौद्धिक, शैक्षणिक विकासात ग्रंथालयाची महत्वाची भूमिका आहे. समाजाची सांस्कृतीक मूल्य जोपासण्याचे कार्य ग्रंथालये करीत आहे. समाजात गं्रथालये सगळयाच प्रकारच्या क्षेत्रात जसे विज्ञान, तंत्रज्ञान,

कला, राजकीय क्षेत्रात माहितीचे संवर्धन करण्याचे काम करीत आहे. कोणत्याही राष्ट्राच्या विकासात ग्रंथालयाचे महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. जसे राष्ट्राच्या विकासात ग्रंथालयाचे महत्व आहे. तसेच या पर्यावरणाच्या मोहितेत सुद्धा ग्रंथालयाचे महत्व असल्याचे जाणवते.

ग्रंथालयात पर्यावरण संतूलन राखण्याकरिता किंवा हरित ग्रंथालयाची निर्मिती करतांना काही गोष्टी ग्रंथालयाच्या दैनदिन कार्यात समाविष्ट करून पर्यावरण पुरक वातावरण निर्माण करण्यास मदत होऊ शकेल.

1. ग्रंथालयाची प्रकाश व्यवस्था मोकळी ठेवणे.
2. काम नसतांना संगणक आणि मॉनिटर्स बंद करणे.
3. ग्रंथालय जर वर असेल तर लिफ्ट ऐवजी सीडीचा वापर.
4. पेपरचा कमीत कमी वापर करणे.
5. विद्यार्थ्यांना वापरात असलेल्या संगणकाच्या वेळेत मर्यादा ठेवणे.
6. ग्रंथालयात लॅन पद्धतीने इलेक्ट्रीकचा वापर करावा.
7. काम नसेल तिथे लाईट, फॅन बंद करणे.
8. ग्रंथालयाच्या कामकाजात पेपर पेक्षा डिजिटल स्वरूपात जास्त वापर करणे.
9. प्लास्टीकचा वापर पूर्णतः बंद करणे.
10. पाणी बचतीसाठी सर्व नळ सुव्यवस्थित ठेवावेत.
11. ग्रंथालयात धूळ कमी प्रमाणात यावी म्हणून ग्रंथालयाच्या आजूबाजूला झाडे लावावीत. यामुळे नैसर्गिक हवा मिळण्यास मदत होईल.
12. ग्रंथालयात फारशी वापरात नसलेल्या पुस्तकांच्या सीडी. तयार करून ठेवाव्यात.
13. ग्रंथालयातील कालबाहय पुस्तकाचा निकालात काढण्याची तरतूद करावी.
14. ग्रंथालयात ई-बुक्स, ई-जर्नल्स हयाचा वापर वाढवावा.

अशाप्रकारे ग्रंथालयात अनेक उपाय योजना अमलात आणून पर्यावरण पुरक अशा हरित ग्रंथालयाची निर्मिती करता येते.

**निष्कर्ष :**

आज संपूर्ण जगात पर्यावरण विषयी जागरूगता निर्माण झाली आहे. प्रत्येक ठिकाणी पर्यावरणाविषयी भरभरून बोलल्या जात आहे. घराचे बांधकाम करतांना पर्यावरण पुरक असे बांधकाम केल्या जाते. अशातच ग्रंथालय सुद्धा पर्यावरण संतुलित राखण्यास हातभार लावतांना दिसून येतात. आजच्या काळात कित्येक बगिच्यामध्ये बांबूपासून तयार झालेले ग्रंथालय सुरू केल्या गेली आहे. याचा उद्धेश एकच बगिच्यात फिरायला येणारी व्यक्ती हिरव्या वातावरणात राहून पुस्तक वाचनाचा आनंद घेवू शकले पाहिजे. पर्यावरण रक्षणासाठी संपूर्ण समाज पुढे येत असतांना ग्रंथालय यापासून दूर कसे राहू शकेल. ग्रंथालय सुद्धा या पर्यावरण पुरक चळवळीत या हरित क्रांतीत सहभागी होऊन आपले योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहे. याकरिताच हरित ग्रंथालयाची निर्मिती

करून समाजात पर्यावरण पुरक ग्रंथालय निर्मिती करून पर्यावरण संतूलन राखण्यास हातभार लावण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

**संदर्भ :**


- घोरपडे, अभिजित: गाथा पर्यावरणाची; राजहंस प्रकाशन, पुणे
- खंदारे, उषा: संवर्धन पर्यावरणाचे; कोमल प्रकाशन, पुणे
- कुलकर्णी, दिलीप: दैनंदिन पर्यावरण; राजहंस प्रकाशन, पुणे
- हब्बु, वेदवती: हरित ग्रंथालये; ज्ञानगंगोत्री, सप्टेंबर 2009-फेब्रु. 2010
- होले, डॉ. विनोद मुकंद: हरित ग्रंथालय काळाची गरज, ज्ञानगंगोत्री जून 2018-ऑगस्ट 2018